स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

एक पाऊल स्वच्छतेकडे..


**महाराष्ट्र शासन**
विधि व न्याय विभाग,
मंत्रालय, मुख्य इमारत, पाचवा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०००३२.

दूरध्वनी क्रमांक ०२२२२७९३६१०    E mail ID – sharmila.nagle@nic.in


---

क्रमांक : इएसटी-२०२२/प्र.क. १६६/का.२    दिनांक :- ०१ ऑगस्ट , २०२२.

प्रति,

सर्व सेवा पुरवठादार/संस्था,
मुंबई.

**विषय:** दैनिक ठोक मानधनावर/रकमेवर वाहन चालकाच्या सेवा उपलब्ध करून घेण्यासंदर्भात नामांकित सेवा पुरवठादारांकडून / संस्थांकडून दरपत्रके मागविण्याबाबत.

महोदय/महोदया,

विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या आस्थापनेवर ४ शासकीय वाहने मंजुर आहेत. वाहन चालकाची काही पदे रिक्त असल्याने आवश्यकतेनुसार दैनिक ठोक मानधनावर/रकमेवर वेळोवेळी वाहन चालकांच्या सेवा घ्याव्या लागतात. त्यानुषंगाने, नामांकित सेवा पुरवठादारांकडून / संस्थांकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत. तरी, २ लिफाफा बंद पाकिटात तांत्रिक माहितीचे दरपत्रक व व्यापारी माहितीचे दरपत्रक, अशी दोन्ही लिफाफा बंद पाकिटे एका मोठ्या पाकिटात घालून कक्ष अधिकारी (कार्यासन २/आस्थापना), विधि व न्याय विभाग, ५ वा मजला, मुख्य इमारत मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ येथे स्पीड पोस्टाने, नोंदणीकृत डाकेने अथवा हस्त बटवड्याने शुक्रवार, दि.०५.०८.२०२२ रोजी सायंकाळी ५.३० पर्यंत उक्त नमुद पत्त्यावर पोहोच करण्यात यावीत. तांत्रिक दरपत्रकामध्ये संस्थेचे नाव, नोंदणी प्रमाणपत्र, पॅन कार्ड छायाप्रत, आधार कार्ड छायाप्रत इत्यादीबाबतच्या माहितीचा समावेश राहील. तर, व्यापारी दरपत्रकामध्ये वाहन चालकाला द्यावयाच्या, शासकीय कार्यालयीन वेळेच्या किमान ८.३० तासांसाठी

(सकाळी ९.४५ ते सायं.६.१५) व त्यापुढील प्रत्येक तासासाठीच्या दराचा समावेश करून, दैनिक भत्ता/ठोक रक्कम व त्यावरील सेवा कर (SGST/CGST) याबाबतचा तपशिल राहील.

२. प्राप्त झालेल्या दरपत्रकांमधून पात्र सेवा पुरवठादाराची निवड केल्यानंतर संस्थेशी १ वर्षाचा करार करण्यात येईल.

३. प्राप्त झालेली सदर दरपत्रके गुरुवार, दि.१०.०८.२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजता सह सचिव (प्रशासन), विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली तात्पुरत्या स्वरूपात गठीत करण्यात येणाऱ्या दरपत्रक समितीपुढे उघडण्यात येतील. त्यावेळी दरपत्रके भरणाऱ्या संबंधित संस्थांनी त्यांचा प्रतिनिधी पाठवावा. त्यानुषंगाने, नावे कळविण्यात आल्यास, मंत्रालयात प्रवेश देण्याची व्यवस्था करण्यात येईल.

(वै.शि.डिगे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन